हवामान आधारीत कृषि सल्ला
ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ इमेल:rahuri.amfu@gmail.com

७३) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०९.११.२०२६

जिल्हा : अहिल्यानगर

मागील आठवड्यातील हवामान (०२/११/२०२६ ते ०८/११/२०२६)							हवामान घटक	पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१०/११/२०२६ ते १४/११/२०२६)				
०२	०३	०४	०५	०६	०७	०८	<दिनांक>	१०	११	१२	१३	१४
०.०	०.०	०.०	०.०	०.०	०.०	०.०	पाऊस (मिमी)	०	०	०	०	०
३३.०	२९.२	३१.४	३२.६	३२.६	३३.०	३३.२	कमाल तापमान (अंसे)	३४	३४	३४	३३	३३
१७.३	१७.१	१७.५	१७.५	१७.७	१७.५	१७.१	किमान तापमान (अंसे)	१८	१७	१६	१४	१४
४.०	०.०	०.०	०.०	०.०	०.०	०.०	ढग स्थिती (आकाश)	०	०	१	१	१
९०	८३	८०	७८	८०	८१	८०	सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	५५	५५	५६	५४	५७
५२	४४	४०	३९	४०	३८	३६	दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	२०	२०	१९	१८	२२
०.८	०.८	०.९	१.०	०.८	०.९	०.८	वाऱ्याचा वेग (किमी/ तास)	४	५	५	५	६

हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

पीक	अवस्था	कृषि विषयक सल्ला
हवामान सारांश		प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. तसेच तापमानात घट होण्याची शक्यता आहे.
सामान्य सल्ला		१) हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानाच्या पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा. २) वीजेच्या अंदाजाचा पूर्वानुमानाकरीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा. ३) शेतकऱ्यांना आवश्यक ती कृषी विषयक माहिती, हवामान अंदाज, बाजारभाव, कीड-रोग ओळख व नियंत्रण उपाय, हवामान आधारित कृषि सल्ला, गोदामे व कृषी यंत्रसामग्री भाडे केंद्र यांची माहितीकरीता महाविस्तार ऍपचा वापर करावा. ४) पशुधनातील उष्णता व पर्यावरणीय ताण व्यवस्थापनासाठी तसेच तापमान व आर्द्रतेवर आधारित Temperature Humidity Index मोजून जनावरांची स्थिती (सामान्य, इशारा, धोका, आणीबाणी) आणि त्यानुसार त्वरित मार्गदर्शन तसेच जनावरांच्या संतुलित आहाराची माहिती मिळविण्याकरिता फुले अमृतकाल मोबाईल ॲपचा वापर करावा.
संदेश		रब्बी ज्वारीची पेरणी झालेली असल्यास आठ ते दहा दिवसांनी उगवण झाल्यानंतर विरंळणी करून रोपाची संख्या मर्यादीत ठेवावी जेणे करून मर्यादीत ओलाव्या करीताची स्पर्धा टाळता येईल.
कापूस	वेचणी	पिकातील २० ते ३० टक्के बोंडे फुटल्यानंतर पहिली वेचणी करून घ्यावी त्यानंतर १५ ते २० दिवसाच्या अंतराने अनुकमे दुसरी व तिसरी वेचणी करावी. कापूस वेचणी आटोपल्यानंतर सर्व पहाटया उपटून शेताबाहेर न्याव्यात व त्याचा कंपोस्ट खत तयार करण्यासाठी वापर करावा जेणेकरून किंडीच्या सुप्त अवस्था नष्ट होतील.
ज्वारी	रोप अवस्था	रब्बी ज्वारीची पेरणी झालेली असल्यास आठ ते दहा दिवसांनी उगवण झाल्यानंतर विरंळणी करून रोपाची संख्या मर्यादीत ठेवावी जेणे करून मर्यादीत ओलाव्या करीताची स्पर्धा टाळता येईल.
हरभरा	पेरणी	बागायती हरभरा २० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर यादरम्यान पेरणी केल्यास चांगले उत्पादन येते. पेरणीकरता विजय, विशाल, दिग्विजय,फुले विक्रम, फुले विक्रांत आणि फुले विश्वराज या मर रोगास प्रतिकारक्षम असलेल्या वाणांची निवड करावी बिजप्रक्रीया करणे अत्यंत महत्त्वाचे असुन खरीप हंगामातील सोयाबीन पीक निघाल्यानंतर मुळ कुज व मान कुज या रोगापासून संरक्षण होण्यासाठी ट्रायकोडर्मा हरजियानाम १.०% डब्ल्यू. पी. ६ ग्रॅम प्रति किलो बीजप्रकियेसाठी तसेच आळवणीसाठी लागवडीनंतर ५० दिवसांनी वापरावी. यानंतर प्रत्येकी २५० ग्रॅम रायझोबियम व पी.एस.बी. प्रति १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड द्रावणामध्ये मिसळून चोळावे. असे बियाणे तासभर सावलीत सुकवावे आणि मग पेरणी करावी. यामुळे पिकाचे रोप अवस्थेत बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण होते. मुळावरील नत्राच्या ग्रंथी वाढतात आणि पिकाची वाढ चांगली होते. हरभऱ्यावरील घाटे आळीच्या एकात्मिक नियंत्रणासाठी पेरणीच्या वेळी हेक्टरी २०० ग्रॅम ज्वारी हरभरा पेरताना मिसळून पेरावी.

हवामान आधारीत कृषि सल्ला
ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ इमेल:rahuri.amfu@gmail.com

रब्बी मका	**पेरणी**	रब्बी मका पेरणी जमिनीत पुरेसा ओलावा असताना १० नोव्हेंबरपर्यंत करावी. बीजप्रक्रिया: २ ते २.५ ग्रॅम थायरम/ किलो बियाणास पेरणीपूर्वी लावावे. तसेच पेरणीपूर्वी ॲझोटोबॅक्टर वापरावे. खतमात्रा: पेरणीच्यावेळी ४० किलो नत्र, ६० किलो स्फुरद, ४० किलो पालाश प्रति हेक्टर द्यावे.
गहू	**पेरणीपूर्व तयारी**	गव्हाची पेरणी १ ते १० नोव्हेंबर या कालावधीत करावी. बागायती वेळेवर पेरणीकरिता: एन आय ए डब्लू ३०१ (त्र्यंबक), एन आय ए डब्लू ९१७ (तपोवन), एन आय डी डब्लू २९५ (गोदावरी) बागायती उशिरा पेरणीकरिता: एन आय ए डब्लू ३४, ए के ए डब्लू ४६२७ जिरायत पेरणीकरिता: एन आय डी डब्लू. १५ (पंचवटी), ए के डी डब्लू २९९७ (शरद) कमी पाण्यात पेरणीकरिता: निफाड ३४, एन आय ए डब्लू १४१५ (नेत्रावती) हेक्टरी १०० ते १२५ किलो बियाणे वापरावे. पेरणीच्या वेळी हेक्टरी ६० किलो नत्र, ६० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश व पेरणीनंतर ३ आठवडयांनी खुरपणी केल्यानतर उर्वरीत ६० किलो नत्र द्यावे.
बटाटा	**पेरणीपूर्व तयारी**	रब्बी हंगामासाठी बटाटा या पिकांच्या लागवडीकरीता कुफरी ज्योती, कुफरी लवकर, कुफरी सिंधुरी, कुफरी सूर्या, कुफरी पुखराज ई.जातींचा वापर करावा.
वाटाणा	**पेरणीपूर्व तयारी**	रब्बी हंगामासाठी वाटाणा या पिकांच्या लागवडीकरीता फुले प्रिया, बोनव्हिला, अरकेल ई. वाणांचा वापर करावा.
चारा पिके		जमिनीतील उपलब्ध ओलाव्याचा उपयोग करून चाऱ्यासाठी रब्बी ज्वारीची पेरणी करावी. मका पीक उपलब्ध असलेल्या ठिकाणी मक्यापासून मुरघास तयार करून साठवून ठेवावा. अतिरिक्त हिरवा चारा चांगल्या प्रकारे वाळवून त्याचे पुढील आपत्कालीन परिस्थितीत वापर करावा. पावसाचे प्रमाण कमी असतानाही चांगली वाढणारी आणि प्रतिकूल परिस्थितीत तग धरू शकणारी चारा पिके, जसे की संकरीत नेपिअर, दशरथ आणि स्टायलो, यांची लागवड करावी.
पशुधन व्यवस्थापन		जनावरांचे पिण्याचे हौद किंवा भांडी नियमितपणे (आठवड्यातून एकदा) जनावरांकरीता स्वच्छ व मुबलक पाण्याची व्यवस्था करावी. चारा टंचाईच्या काळात उपलब्ध चाऱ्याची कुट्टी करून जनावरांना गव्हाणीतून द्यावा. तो एकाच वेळी मोठ्या प्रमाणात न देता जनावरांच्या गरजेनुसार टप्प्याटप्प्याने द्यावा. तसेच, कमी प्रतीचा चारा चांगल्या प्रतीच्या चाऱ्यासोबत योग्य प्रमाणात मिसळून दिल्यास उपलब्ध चाऱ्याचा अधिक परिणामकारक उपयोग करता येतो.
आच्छादनाचा वापर		१) आच्छादनामुळे जमिनीतील ओलाव्याचे बाष्पीभवन कमी होण्यास मदत होते. २) आच्छादनासाठी काडी कचरा,उसाचे पाचट,तुरकाटया,ज्वारीची धसकटे,वाळलेले गवत इ. उपलब्ध सेंद्रीय पीक अवशेष,जमिनीच्या पृष्ठभागावर आच्छादन करण्यास उपयुक्ता आहेत. ३) बाष्पीभवनामुळे जमिनीतील सुमारे ७० टक्के ओल उडून जाते. ती थोपवून धरण्यासाठी शेतातील निरुपयोगी काडी कचरा,धसकटे,गवत,तुरकाडयाचा वापर पीक उगवणीनंतर १५ दिवसांचे आत पिकाच्या दोन ओळीत जमिनीवर हेक्टरी ५ टन पसरावे. यामुळे २५ ते ३० मि.मि. ओलाव्याची बचत होते आणि उत्पादनात ३० ते ४० टक्यांनी वाढ होते.

स्त्रोत :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि, राहुरी.

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.
दि. : ०९.११.२०२६

स्वाक्षरीत
प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा
प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.